श्री सच्चिदानंद शिक्षण संस्था नागपुर

# तायवाडे कॉलेज महादुला- कोराडी

# करिअर कट्टा अहवाल

# २०२४

प्राचार्य



डॉ. शरयू तायवाडे

समन्वयक



डॉ. वर्षा वैद्य

समन्वयक



डॉ. कमलेश डाबरे

# अनुक्रमणीका


| | |
|---|---|
| १ | करीअर कट्टा फलक |
| २ | माहिती पुस्तिके मधे समावेश |
| 3 | करीअर संसद अधिवेशन -बारामती (11-12 Jan 2024) |
| ४ | राज्यस्तरीय स्पर्धा पुरस्कार २०२४ |
| ५ | राज्यस्तरीय कार्यशाळा नागपुर २९-३१ मार्च 2०२४ |
| ६ | विद्यार्थी नोंदणी - २०२४ |
| ७ | करीअर संसद स्थापना /शपथ ग्रहण |
| ८ | इंडक्शन प्रोग्राम ( ऑगस्ट २०२४) |
| ९ | आवाजाची कार्यशाळा २०/८/२४ |
| १० | विद्यार्थी संवाद कार्यशाळा २१/०८/२४ |
| ११ | करीअर संसद पदाधिकारी सभा ( नागपुर विभाग) |
| १२ | **युवा विकास धोरण या विषयावर यशदा येथे झालेल्या कार्यशाळेला उपस्थिती** |
| १३ | स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन |
| १४ | सेंटर ऑफ एक्सलन्स |
| १५ | कौशल्य विकास केंद्र उपक्रम |
| १६ | आपल्या क्षेत्रात यशस्वी झालेल्या व्यक्तींच्या करीअर संसद पदाधिकार्यांनी घेतलेल्या मुलाखती |
| १७ | करीअर संसद पदाधिकारी सभा – |
| १८ | आधुनिक सावित्री या पुरस्कारासाठी अभिनंदन |
| १९ | Add oncourse |









करीअर कट्टा फलक- महाविद्यालयाच्या दर्शनी भागात करीअर कट्टा फलक लावण्यात आले आहे.जेणेकरून प्रवेश घेण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना याबद्दल माहिती मिळेल.

**माहिती पुस्तिके मधे समावेश** - विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असलेला करीअर कट्टा: याबद्दल सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना मिळावी म्हणून माहिती पुस्तिकेमध्ये याचा समावेश करण्यात आला आहे .याशिवाय प्रथम वर्षाला प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना करीअर कट्टा माहिती देवून त्यांची नोंदणी प्रवेश घेतांना करीअर कट्टा ला करण्यात आली.



TAYWADE COLLEGE
(ARTS, COMMERCE & SCIENCE)

**Career Katta**

**(Career and Entrepreneurship Counselling, Skill Development, Internships, Placement, etc.)**

**Career Katta** is an initiative of Department of Higher and Technical Education, Govt of Maharashtra and in coordination with Maharashtra Information Technology Support Centre. The college conducts various activities to guide students about Career, Competitive Examinations (UPSC, MPSC, Banking, SSB, SSC, Police, LIC, etc.), Entrepreneurship, Skill Development; Credit Earnings under new CBCS and NEP Curriculum Framework, Internship and Placement Opportunities, etc.

**Eligibility to Join:**
Any student admitted for any regular course in the college or college alumni referred by College Coordinator.

**Registration Fees:** One Time Rs. 365 for Three-year degree period (Rs. 0.36 per day), which will be reimbursed in the form of subsidy on examination charges of CBCS. It includes free access to all the activities, courses, State Level Competitive Exams, etc.
**How to Register:** Download the MITSC application from Google Play Store and pay fees using any online
payment mode
**College Code: C-18526**
**For more details visit** college webpage www.taywadecillege.edu.in | **or Contact Coordinator**
**Dr. Varsha Vaidya,** Head Department of English, **9822703052** or
Career Katta **Helpline 7507652555**

करियर कट्टा मध्ये विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी करण्यासाठी | यूट्यूब वरील उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी सबस्क्राईब करा | करियर कट्टा नियमित उपक्रमाची माहिती मिळवण्यासाठी सबस्क्राईब करा

हेल्पलाइन नंबर : 750 765 2555

**Ladies Hostel Facility**

College has facility of Ladies Hostel for Girls of Taywade College. The students seeking admission in Hostel should submit their application to Principal. Principal reserves the right to accept or reject any application.

**College Canteen**

College has a canteen facility to serve delicious and healthy snacks to students at subsidized rate.

36 PROSPECTUS 2024-2025

**करीअर संसद अधिवेशन -बारामती (11-12 Jan 2024)**

दिनांक ११ व १२ जानेवारी २४ ला करीअर संसदेचे पहिले अधिवेशन शारदाबाई पवार कॉलेज बारामती येथे संपन्न झाले . पहिल्या संसदेचे पदाधिकारी व समन्वयक डॉ. वर्षा वैद्य या कार्यशाळेला उपस्थित होत्या. आधुनिक पद्धतिने केलेली शेती, इन्कुबेशण सेंटर , अनेक मान्यवरांचे मौलिक मार्गदर्शन याचा लाभ या अधिवेशनात या संसदेच्या पदाधिकार्यांना मिळाला.






## राज्यस्तरीय स्पर्धा पुरस्कार २०२३

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने २०२३ या वर्षात करीअर कट्टा तर्फे केलेल्या सर्व कार्यांचा आढावा घेण्यासाठी राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन केले जाते .या स्पर्धेमध्ये एकूण चार पुरस्कार तायवाडे कॉलेज ला मिळाले. उत्कृष्ट विभागीय महाविद्यालय प्रथम पुरस्कार, उत्कृष्ट जिल्हास्तरीय महाविद्यालय ग्रामीण प्रथम पुरस्कार (ग्रामीण), उत्कृष्ट प्राचार्य प्रवर्तक प्रथम पुरस्कार तसेच उत्कृष्ट महाविद्यालयीन समन्वयक प्रथम पुरस्कार यांचा यात समावेश आहे .





महाराष्ट्र राज्य
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र
यांच्या संयुक्त विद्यमाने

करिअर कट्टा

युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी.....

प्रमाणपत्र

* महाविद्यालयीन स्पर्धा २०२३-२४ *

तायवाडे कॉलेज, महादुला,
कोराडी


महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने
'करिअर कट्टा' या उपक्रमांतर्गत आयोजित महाविद्यालयीन स्पर्धेमध्ये
उत्कृष्ट जिल्हास्तरीय महाविद्यालय प्रथम क्रमांक
मिळवल्याबद्दल आपणांस हे प्रमाणपत्र सन्मानपूर्वक
प्रदान करण्यात येत आहे.
हार्दिक अभिनंदन !

दिनांक : २५ फेब्रुवारी, २०२४

श्री. यशवंत शितोळे
अध्यक्ष
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

**उत्कृष्ट जिल्हास्तरीय महाविद्यालय प्रथम पुरस्कार (ग्रामीण)**




महाराष्ट्र राज्य
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र
यांच्या संयुक्त विद्यमाने

करिअर कट्टा

युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी.....

प्रमाणपत्र

* महाविद्यालयीन स्पर्धा २०२३-२४ *

तायवाडे कॉलेज, महादुला,
कोराडी

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने
'करिअर कट्टा' या उपक्रमांतर्गत आयोजित महाविद्यालयीन स्पर्धेमध्ये
उत्कृष्ट विभागीय महाविद्यालय प्रथम क्रमांक
मिळवल्याबद्दल आपणांस हे प्रमाणपत्र सन्मानपूर्वक
प्रदान करण्यात येत आहे.
हार्दिक अभिनंदन !

दिनांक : २५ फेब्रुवारी, २०२४

श्री. यशवंत शितोळे
अध्यक्ष
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

**उत्कृष्ट विभागीय महाविद्यालय प्रथम पुरस्कार**






उत्कृष्ट प्राचार्य प्रवर्तक प्रथम पुरस्कार








नवराष्ट्र

**तायवाडे कॉलेजचा चार पुरस्काराने गौरव**

कोराडी, वार्ताहर. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र माहीती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र करीअर कट्टा यांच्या माध्यमातुन युवकांच्या सर्वांगिण विकासासाठी चालविण्यात येणाऱ्या उपक्रमाअंतर्गत शैक्षणिक वर्ष 2023-24 या वर्षातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन धनवटे नॅशनल कॉलेज नागपूर येथे करण्यात आले. याप्रसंगी उत्कृष्ट कामगीरीबद्दल एकुण चार पुरस्कार तायवाडे कॉलेजला मिळाले. यामध्ये नागपूर विभाग उत्कृष्ट महाविद्यालय प्रथम पुरस्कार, नागपूर जिल्हा उत्कृष्ट महाविद्यालय ग्रामीण प्रथम पुरस्कार, प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे यांना उत्कृष्ट ... वर्षा वैद्य यांना नागपूर जिल्हा उत्कृष्ट महाविद्यालयीन समन्वयक प्रथम पुरस्कार यांचा समावेश आहे. हे पुरस्कार स्वतंत्र संचालक एनएचपीएस उदय निर्गुडकर, सचिव पावर सेक्टर स्कील कौन्सिल प्रफुल्ल पाठक, यशवंत शीतोळे या मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. हा सोहळा नागपूर विभागातील सर्व प्राचार्य ...

**राज्यस्तरीय कार्यशाळा नागपुर २९-३१ मार्च २०२४**




राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजन संदर्भातील बैठक

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व करिअर कट्टा अंतर्गत तायवाडे महविद्यालयात २९-३१ मार्च दरम्यान तीन राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेचे उद्रघाटन डॉ प्रशांत बोखारे , कुलगुरू गोंडवाना विद्यापीठ यांच्या हस्ते ,डॉ बबनराव तायवाडे,अध्यक्ष सच्चिदानंद शिक्षण संस्था , मा. यशवंत शितोळे यांच्या उपस्थितीत पार पडले. डॉ. शैलेंद्र देवलानकर .संचालक उच्च अ तंत्र शिक्षण विभाग यांनी ऑनलाईन मार्गदर्शन कार्यशाळेला केले. या कार्यशाळेत अनेक महत्वाच्या विषयावर मंथन झाले.महाराष्टातून प्राचार्य प्रवर्तक, विभागीय समन्वयक, सह्विभागीय समन्वयक, जिल्हा समन्वयक कार्यशाळेला उपस्थित होते.













लोकमत

# शैक्षणिक धोरणावरील राज्यस्तरीय कार्यशाळेचे उद्घाटन

**कोराडी :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र व तायवाडे कॉलेजच्या वतीने 'करिअर कट्टा : युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' या विषयावर त्रीदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले आहे. उद्घाटन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे यांनी केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बबनराव तायवाडे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून उच्चशिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळणकर, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्राचे प्रमुख डॉ. यशवंत शितोळे, प्राचार्य प्रवर्तक डॉ. महेंद्र ढोरे, प्राचार्य डॉ. सुजित मेत्रे, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे, करिअर कट्टा समन्वयक डॉ. वर्षा वैद्य, डॉ. खेडेकर उपस्थित होते. संचालन डॉ. कोमल ठाकरे यांनी केले, तर आभार डॉ. वर्षा वैद्य यांनी मानले.

Hello Nagpur Gramin
Page No. 6 Mar 31, 2024
Powered by: erelego.com



देशोन्नती

देशोन्नती वृत्तसंकलन...

# शासनाच्या योजना समाजापर्यंत पोहचविण्याची गरज : कुलगुरू

**कोराडी** ▪ देशाचे चित्र बदलविण्यासाठी युवकांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. आपले प्रश्न सोडविण्यासाठी आपल्याला मॉडेल तयार करावे लागतील आणि ते करिअरच्या माध्यमातून होते. जग चालविण्यासाठी कौशल्याची गरज आहे आणि ते कौशल्य करियर कट्ट्यातून मिळत असते. याची जाणीव राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी करून दिली.

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व श्री सच्चिदानंद शिक्षण संस्थाद्वारा संचालित तायवाडे कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर कट्टा युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण या विषयावर तीन दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयात झाले. उद्घाटनानंतर डॉ. बोकारे बोलत होते. याप्रसंगी अध्यक्षस्थानी श्री सच्चिदानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. बबनराव तायवाडे, उद्घाटक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, प्रमुख मार्गदर्शक म्हणून उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळणकर, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे प्रमुख डॉ. यशवंत शितोळे, प्राचार्य प्रवर्तक डॉ. महेंद्र ढोरे, प्राचार्य डॉ. सुजीत मेत्रे, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे, करिअर कट्टा समन्वयक डॉ. वर्षा वैद्य प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळणकर, प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे, डॉ. यशवंत शितोळे, प्राचार्य डॉ. सुजीत मेत्रे, प्राचार्य डॉ. महेंद्र ढोरे, डॉ. खेडेकर यांनीही करिअर कट्ट्याची उपलब्धी सांगून विद्यार्थी विकासासाठी करिअर कट्टा कसा महत्त्वाचा आहे याची जाणीव करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कोमल ठाकरे यांनी केले तर आभार डॉ. वर्षा वैद्य यांनी मानले. (प्रतिनिधी)

Nagpur Edition
Mar 30, 2024 Page No. 5
Powered by : eReleGo.com

8:42 am



दैनिक जनप्रभात

Page 4
02 Apr 2024

# शासकीय व निमशासकीय सेवेत नोकरीच्या विविध संधी - डॉ. उत्तम गायकवाड



दैनिक देशोन्नती दि.02/04/2024

# तायवाडे महाविद्यालयात राज्यस्तरीय कार्यशाळा

देशोन्नती वृत्तसंकलन...

**कोराडी** ▪ महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र व श्री सच्चिदानंद शिक्षण संस्थाद्वारा संचालित तायवाडे कॉलेज महादुला-कोराडी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर कट्टा अंतर्गत 'युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' या विषयावर तीन दिवसीय राज्यस्तरीय आयोजित करण्यात आली होती.

दुसऱ्या दिवशीच्या परिसंवादात अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे, प्रमुख वक्ते बीसीसीआयएल दिल्लीचे प्रमुख डॉ. उत्तम गायकवाड, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे प्रमुख डॉ. यशवंत शितोळे, करीअर कट्टा समन्वयक डॉ. वर्षा वैद्य प्रामुख्याने उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. यशवंत शितोळे, सूत्रसंचालन डॉ. वर्षा वैद्य यांनी केले. यानंतर प्रकल्प विषयक माहिती महाराष्ट्रातील विविध प्राचार्य प्रवर्तकांनी दिली. समारोपाप्रसंगी अध्यक्षस्थानी श्री सच्चिदानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे, प्रमुख अतिथी म्हणून डॉ. उत्तम गायकवाड, डॉ. यशवंत शितोळे, प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे, प्राचार्य डॉ. सुजीत मेत्रे, डॉ. वर्षा वैद्य, डॉ.नरेंद्र रघटाटे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी पुणे, अहमदनगर, नाशिक, मुंबई, पालघर, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, कोल्हापूर, चंद्रपूर, सांगली, सातारा इत्यादी जिल्ह्यातील जिल्हा प्रतिनिधींना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. राज्यस्तरीय करिअर कट्टा पुरस्काराचे वितरण डॉ. बबनराव तायवाडे यांच्या हस्ते करण्यात आले. समारोपीय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कोमल ठाकरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. वर्षा वैद्य यांनी व्यक्त केले. (प्रतिनिधी)

## विद्यार्थी नोंदणी - २०२४

**तायवाडे कॉलेज, कोराडी –नागपुर**

**2024 मधे तायवाडे कॉलेज चे 1247 व क्लस्टर कॉलेज ची मिळून सगळी (1560) विद्यार्थ्यांची नोंद्णी वेळेत केलेली आहे. याची संपूर्ण माहिती dashboard ला आहे**


## करीअर संसद स्थापन


**दिनांक १०/०७/२४ ला महाविद्यालयामध्ये करीअर संसद स्थापन झाली .प्राचार्यांच्या उपस्थितीत त्यांना पदाधिकारी प्रमाणपत्र देण्यात**




दिनांक १५ जुलै २०२४ ला जागतिक युवा कौशल्य दिनाचे आयोजन महविद्यालयात करण्यात आले होते या जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त शपथ ग्रहण करतांना करीअर संसद पदाधिकारी





## सेंटर ऑफ एक्सलन्स एक दिवसीय कार्यशाळा

दिनांक १५ जुलै २०२४ ला जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रध्ध्यान सहायता केंद्र आणि शारदाबाई पवार महिला कला , वाणिज्य आणि विध्यान महाविद्यालय , शारदानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत सेंटर ऑफ एक्सलन्स एक दिवसीय कार्यशाले ला प्राचार्य प्रवर्तक डॉ.शरयू तायवाडे व सह विभागीय समन्वयक डॉ. वर्षा वैद्य यांची उपस्थिती






---



## इंडक्शन प्रोग्राम ( ऑगस्ट २०२४)

**महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व करिअर कट्टा अंतर्गत करीअर कट्टा ची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी याकरिता इंडक्शन प्रोगरम** चे आयोजन करण्यात आले होते . यात विद्यार्थ्यांना करीअर कट्टा कसा महत्वाचा आहे तसेच कौशल्य मिळवण्यासाठी करीअर कट्टा अंन्तर्गत घेण्यात येणारे कोर्सेस ,स्पर्धा परीक्षेसाठी चे क्लासेंस , नवीन राष्ट्रीय शैक्षनिक धोरनात झालेल्या बदलामुळे स्कील मिळविण्यासाठी **करीअर कट्टा च्या वतीने घेण्यात येणारे कोर्सेस विद्यार्थ्यासाठी किती महत्वाचे आहे हे सूद्धा या माध्यमातून विद्यात्र्यांना सांगण्यात आले . सर्व शाखांचे विद्यार्थी या कार्यशाळेला उपस्थित होते .**









**नवराष्ट्र**

### विद्यार्थ्यांनी ‘करियर कट्टा’चा लाभ घ्यावा

डॉ .शरयू तायवाडे यांचे आवाहन

**कोराडी, वार्ताहर.** तायवाडे महाविद्यालयातील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना ‘करियर कट्टा’ या उपक्रमाबद्दल माहिती देण्यासाठी इंडक्शन प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे, प्रवर्तक ‘करियर कट्टा’ या अध्यक्षस्थानी होत्या. ग्रामीण भागातील विद्यार्थाना व्यवसाय मार्गदर्शन उपलब्ध व्हावे, या हेतूने महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रज्ञान शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने तायवाडे महाविद्यालयाला सेंटर ऑफ एक्सलन्स व कौशल्य विकास केंद्राची मान्यता मिळाली. या विषयी संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना मिळावी, करियर कट्टा अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या उपक्रमाची माहिती विद्यार्थ्यापर्यंत पोचवावी यासाठी मंगळवारला प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्याकरिता इंडक्शन प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले. करियर कट्टा या उपक्रमांतर्गत आय.ए.एस. आपल्या भेटीला व उद्योजक आपल्या भेटीला हे उपक्रम राबविण्यात येतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयात ही सुविधा मिळत आहे, त्याचा पुरेपूर लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा यासाठी महाविद्यालयीन समन्वयक डॉ. वर्षा वैद्य यांनी या सगळ्या उपक्रमाची माहिती प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना सविस्तरपणे दिली. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.शरयू तायवाडे यांनी सर्व उपक्रमाचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपले कर्तुत्व सिद्ध करायची चांगली संधी आहे, असेही सांगितले. प्रत्येकांनी आपल्या अभ्यासाचा कल ओळखून प्लान ‘ए’ व प्लान ‘बी’ तयार करून घ्यावा. आयुष्यात आपण असे केले तर नक्कीच पुढे जाल, यशस्वी व्हाल अशी अपेक्षा व्यक्त केली. करिअर संसदेची विद्यार्थीनी वैष्णवी काळे हिने ‘करिअर कट्टा’ कसा महत्वाचा आहे. हे आपल्या अनुभवातून समजावून सांगितले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. वर्षा वैद्य यांनी तर आभार डॉ. कमलेश डाबरे यांनी केले. या कार्यक्रमाला बी.एस.सी, बी.सी.ए. प्रथम वर्षाचे विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते.



### करियर कट्टा उपक्रमाचा आजच्या विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा : डॉ . शरयु तायवाडे

कोराडी ॥ दिलीप येवले

# आवाजाची कार्यशाळा

दिनांक २०/०८/२०२४ ला **महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व करिअर कट्टा यांची संयुक्त विद्यमाने तायवाडे महाविद्यालय व क्लटर मधील प्रधयापकांसाठी ,आवाजाची कार्यशाळा  आयोजित करण्यात आली होती. एकूण १४० प्राध्यापकांनी या कार्यशाळेचा लाभ घेतला.शिक्षकांन्नी आवाजाची काळजी कशी घ्यायला हवी यासाठी अनेक प्रात्यक्षिक करून मा. सोनाली लोहार यांनी आवाजाचे महत्व आणि काळजी याबद्दल महत्वपूर्ण मार्गदर्शन केले.**











लोकशाही वार्ता epaper.lokshahiv

दृष्टिक्षेप

## तायवाडे कॉलेजमध्ये आवाजाची कार्यशाळा

वार्ताहर/कोराडी

तायवाडे कॉलेज महादुला कोराडी, महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर कट्टा उपक्रमांतर्गत आवाजाची कार्यशाळा नुकतचा पार पडली.

या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे होत्या.. या कार्यशाळेसाठी प्रमुख अतिथी, मार्गदर्शक सोनाली लोहार या तसेच नागपूर विभागाच्या करिअर कट्टा प्राचार्य प्रवर्तक, राजकुमार केवलरमानी कॉलेज नागपूर येथील प्राचार्य डॉ. उर्मिला डबीर उपस्थित होते. यावेळी सोनाली लोहार यांनी आवाज गुरुजनांचा वेध देशाच्या भविष्याचा या मूलमंत्राला केंद्रस्थानी ठेवून आवाजाच्या संदर्भात अत्यंत महत्त्वपूर्ण अशी माहिती दिली. आपल्याला बोलताना असणाऱ्या चुकीच्या सवयी, फोनचा अती वापर, वमन, वोकल मिस्यूज, ॲसिडिटी, अलार्जी, एनझायटी, अपुरी झोप, खाण्याच्या वाईट सवयी, व्यायामाचा अभाव, लठ्ठपणा, प्रवास , व्यसन सोडून आपल्याला स्वरयंत्राची काळजी घेता येते असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. संचालन डॉ. वर्षा वैद्य यांनी तर आभार प्रा.डॉ. कमलेश डाबरे यांनी मानले.



नवराष्ट्र

कोराडी वार्ताहर दिलीप येवले 9890561241

मार्गदर्शक सोनाली लोहार यांचे प्रतिपादन • तायवाडे महाविद्यालयात आवाजाची कार्यशाळा

## डोळे आत्म्याचा 'आरसा' तर आवाज 'लाऊडस्पीकर'

कोराडी, वार्ताहर. डोळे हे आत्म्याचा आरसा असतील तर आवाज हा त्याचा लाऊडस्पीकर होय, असे प्रतिपादन प्रमुख मार्गदर्शक तथा नागपूर विभागाच्या करिअर कट्टा प्राचार्या व प्रवर्तक सोनाली लोहार यांनी केले. महादुला कोराडी येथील तायवाडे महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्राच्या संयुक्त विद्यमाने करिअर कट्टा उपक्रमांतर्गत आवाजाची कार्यशाळेत शिक्षकांनी आवाज निर्मिती करण्याचे संदर्भात शारीरिक व मानसिक पातळीवर होणाऱ्या परिणामांची जाणीव करून देताना त्या बोलत होत्या.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शरयू तायवाडे तर प्रमुख अतिथी म्हणून राजकुमार केवलरमानी कॉलेज नागपूरच्या प्राचार्या डॉ. उर्मिला डबीर प्रामुख्याने उपस्थित होत्या. मार्गदर्शक सोनाली लोहार यांनी 'आवाज गुरुजनांचा वेध देशाच्या भविष्याचा' या मूलमंत्राला केंद्रस्थानी ठेवून आवाजाच्या संदर्भात अत्यंत महत्त्वपूर्ण अशी माहिती देताना शिक्षक हा व्यावसायिक कारणासाठी आवाज वापरणारा वर्ग आहे. स्वरतारा, स्वरयंत्र याविषयी माहिती देताना त्यांनी फुफ्फुसाचे आवाजासाठी असणारे महत्व अनन्यसाधारण आहे. तसेच तोंडातील सर्व अवयव फार महत्वाचे असते. आपल्याला बोलताना असणाऱ्या चुकीच्या सवयी, फोनचा अती वापर, वमन, वोकल मिस्युज, ॲसिडिटी, अलर्जी, एन्झायटी, अपुरी झोप, खाण्याच्या वाईट सवयी, व्यायामाचा अभाव, लठ्ठपणा, प्रवास, व्यसन सोडून आपल्या स्वरयंत्राची काळजी घेता येत असल्याचे त्या म्हणाल्या.

सोनाली लोहार यांनी आवाजाच्या समस्यांवरील उपचार पद्धती सांगताना प्रथम तज्ज्ञांकडे जाणे, कान, नाक, घसा, फुफ्फुस तपासणे, गरज असल्यास आवाजाचा ईसीजी काढणे अशी काळजी घ्यावी. आवाजविषयी गैरसमजही असतात. आवाज सुधरविण्यासाठी आवाज निर्मिती संस्थेचा तोल साभाळने, स्नायुची ताकद वाढविणे, कंठ सुचिता, उपचार तंत्रसाठी दर पंधरा मिनिटांनी पाण्याचा एक घोट घ्यावा, काम नसेल तेव्हा वोकल मिस यूज टाळावे, घसा साफ करावा, आवाजाची रेंज समजून घेत ती ओलांडू नये, बोलताना अपवर्ड फॉरवर्ड फोकस ठेवावा, कॉफी पिऊ नये, दिवसातून किमान एकदा गरम पाण्याची वाफ घ्यावी, व्यायाम करावा, आवश्यक असल्यास मायक्रोफोन वापरावा, 7 ते 8 तास झोप घ्यावी, जेवणानंतर लगेच झोपू नये, छोट्या वाक्यात बोलावे, रात्री दही खाणे टाळावे, व्यायाम करावा, या सर्व बाबींचा विचार करून त्यानुसार आपण स्वतः काळजीपूर्वक जगलो तर आपण आवाज कायम उत्तम ठेवू शकतो. अशी अत्यंत महत्त्वपूर्ण माहिती त्यांनी दिली. संचालन करिअर कट्टा समन्वयक डॉ.वर्षा वैद्य तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.कमलेश डाबरे यांनी केले.

## विद्यार्थी संवाद कार्यशाळा

दिनांक २१/०८/२४ ला नवीन नोंद्रि झालेल्या विद्यार्थ्यासाठी संवाद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते . आपले करीअर किती महत्वाचे आहे आणि ते कसे निवडावे यावर मा. यशवंत शितोळे यांनी मार्गदर्शन केले. आपण आयुष्यात नियोजन करीत नाही आणि मग यश मिळत नाही म्हणून खचून जातो .जर आपण आयुष्यात प्लान A आणि प्लान B तयार ठेवले आणि एक यशस्वी नाही झाला तर दुसरा अमलात आनता येईल यामुळे खच्चीकरण न होता आपल्याला आयुष्यात काही चांगले करता येईल असे मार्गदर्शन शितोळे सरांनी केले. क्लस्टर मधील सर्व कॉलेज चे विद्यार्थी या कार्यशाळेला उपस्थित होतेव






विद्यार्थी संवाद कार्यशाळेला २०23 आणि २०२४ दोन्ही संसद उपस्थित होत्या.







२०२४ संसद

२०२3 संसद

या विद्यार्थी संवाद कार्यशाळे मधे नागपुर पोलिस विभागात नियुक्त झालेल्या कॉलेज मधील दोन विद्यार्थिनीं स्वाती रमेश टेम्भरे व सुहानी रमेश टेम्भरे या भगिनीचा मा. यशवंत शितोळे सरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.





विद्यार्थी संवाद कार्यशाळे मधे आगस्ट महिन्याच्या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले .



लोकशाही वार्ता

## नियोजनाच्या अभावामुळे युवक यशापासून दूर – यशवंत शितोळे

वार्ताहर / कोराडी

तायवाडे कॉलेज, महादुला- कोराडी , महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यक केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर कट्टा उपक्रमांतर्गत युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी 'विद्यार्थी संवाद कार्यशाळा' तायवाडे महाविद्यालयात आयोजित करण्यात आला. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे होते. या प्रमुख अतिथी मार्गदर्शक यशवंत शितोळे अध्यक्ष महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र महाराष्ट्र औषधी निर्माण शास्त्र महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. गिता लोधी व औषधी निर्माण शास्त्र (डिप्लोमा) प्रा.विक्रांत चिलाटे मंचावर उपस्थित होते. याप्रसंगी यशवंत शितोळे यांनी करिअरचे नियोजन असावे लागते. त्यासाठी एमपीएससी व युपीएससी परीक्षेपेक्षा इतरही क्षेत्रात करिअरच्या संधी उपलब्ध आहेत. परंतु, त्याचा शोध घेतला पाहिजे. महाराष्ट्रातील युवकात नियोजनाचा अभावामुळे ते बरेचदा यशापासुन दूर राहतात. जगण्यासाठी एक तरी स्कील पुरेपूर आत्मसात करणे गरजेचे आहे. घरातील जेष्ठांशी संवाद साधणे आज गरजेचे आहे. मोबाईलचा योग्य वापर केला तर आपले ध्येय साधायला मदत होते. ज्यांना आपली उन्नती करायची आहे त्यांच्यासाठी करिअर कट्टा असल्याची जाणीव त्यांनी करून दिली. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थांची निरनिराळ्या रोजगाराच्या क्षेत्रात निवड होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त करायचे असेल तर दहाव्या वर्गापासुनच तयारी केली पाहिजे. जीवनात यशस्वी होण्यासाठी समस्या निर्माण होणे देखील गरजेचे आहे. करिअर कट्टा विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून देत आहे. त्याचा विद्यार्थ्यांनी फायदा घेतला पाहिजे त्यासाठी चिकाटी व सातत्य ठेवले पाहिजे. असा मौलिक संदेश त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला. यावेळी करिअर कट्टा विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. वर्षा वैद्य यांनी केले.

दैनिक जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
Page 7
23 Aug 2024

## महाराष्ट्रातील युवकात नियोजनाचा अभाव असल्याने ते बरेचदा यशापासून दूर राहतातः यशवंत शितोळे

कोराडी ■ दिलीप येवले




तायवाडे कॉलेज, महादुला- कोराडी , महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यक केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर कट्टा उपक्रमांतर्गत युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यार्थी संवाद कार्यशाळा तायवाडे महाविद्यालयात आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे होत्या. या कार्यशाळेसाठी प्रमुख अतिथी मार्गदर्शक मा. यशवंत शितोळे अध्यक्ष महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र महाराष्ट्र औषधी निर्माण शास्त्र महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. गिता लोधी व औषधी निर्माण शास्त्र (डीप्लोमा) प्रा.विक्रांत चिलाटे मंचावर उपस?थित होते.

महाराष्ट्र गीताने या कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी मा. यशवंत शितोळे यांनी करिअरचे नियोजन असावे लागते. त्यासाठी एमपीएससी व यूपीएससी परीक्षेपेक्षा इतरही क्षेत्रात करिअरच्या संधी उपलब्ध आहेत परंतु त्याचा शोध घेतला पाहिजे. महाराष्ट्रातील युवकात नियोजनाचा अभाव असल्याने ते बरेचदा यशापासून दूर राहतात. जगण्यासाठी एक तरी स्कील पुरेपूर आत्मसात करणे गरजेचे आहे. घरातील जेष्ठांशी संवाद साधणे आज गरजेचे आहे. मोबाईलचा योग्य वापर केला तर आपले ध्येय साधायला मदत होते. ज्यांना आपली उन्नती करायची आहे त्यांच्यासाठी करिअर कट्टा असल्याची जाणीव त्यांनी करून दिली.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थांची निरनिराळया रोजगाराच्या क्षेत्रात निवड होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त करायचे असेल तर दहाव्या वर्गापासूनच तयारी केली पाहिजे. जीवनात यशस्वी होण्यासाठी समस्या निर्माण होणे देखील गरजेचे आहे. करिअर कट्टा विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून देत आहे. त्याचा विद्यार्थ्यांनी फायदा घेतला पाहिजे त्यासाठी चिकाटी व सातत्य ठेवले पाहिजे. असा मौलिक संदेश त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला. यावेळी करिअर कट्टा विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. वर्षा वैद्य यांनी केले. यावेळी सर्व महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकमत

## तायवाडे महाविद्यालयात विद्यार्थी संवाद कार्यशाळा



**कोराडी :** महादुला येथील तायवाडे कॉलेज येथे महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त वतीने करिअर कट्टा उपक्रमांतर्गत तरुणांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यार्थी संवाद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे होत्या. प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे, महाराष्ट्र औषधी निर्माणशास्त्र महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. गीता लोधी व औषधी निर्माणशास्त्र (डिप्लोमा) प्रा. विक्रांत चिलाटे उपस्थित होते. यावेळी करिअर कट्टा विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन डॉ. वर्षा वैद्य यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.



# नवराष्ट्र

कोराडी वार्ताहर दिलीप येवले 9890561241

यशवंत शितोळे यांचे प्रतिपादन ● तायवाडे महाविद्यालयात विद्यार्थी संवाद कार्यशाळा

## ...त्यामुळे राज्यातील तरुण यशापासून दूर

## करीअर संसद पदाधिकारी सभा ( नागपुर विभाग)

दिनांक २२ /८/२४ ला सर्व करीअर संसद पदाधिकारी सभा कमला नेहरू कॉलेज नागपुर ला आयोजित करण्यात आली होती.या सभेला तायवाडे कॉलेज संसदेचे सर्व पदाधिकारी ,प्राचार्य व समन्वयक उपस्थित होते. या सभे मधे पदाधीकार्यांना मार्गदर्शन करतांना मा. प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे







कमला नेहरू कॉलेज नागपुर येथे सभेला आलेले सर्व तायवाडे कॉलेज चे पदाधिकार

## शिक्षक दिन चे आयोजन

करिअर संसदेच्या पदाधिकाऱ्यांनी मिळून तायवाडे कॉलेज मधील सर्व शिक्षक यांना गुलाब पुष्प देऊन स्वागत केले









## युवा विकास धोरण -या विषयावर यशदा येथे झालेल्या कार्यशाळेला उपस्थिती











### विविध क्षेत्रातील करीअर च्या संधी यावर आयोजित मान्यवरांचे मार्गदर्शन

### १ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

**मा. गजानन पाटील-यूनीक अकॅडेमी पुणे**

तायवाडे कॉलेज मधे करीअर कट्टा व स्पर्धा परीक्षा समिती च्या वतीने मा. गजानन पाटील यूनिक अकॅडेमी यांचे स्पर्धा परीक्षेवर मार्गदर्शन आयोजित केले होते. MPSC तसेच इतर स्पर्धा परीक्षेसाठी

असलेला अभ्यासक्रम याची माहिती दिली. या परीक्षेसाठी कशी तायारी करावी हे सांगतांनाच मेहनतीशिवाय यश मिळणार नाही हे पण त्यांनी स्पष्ट केले.








# स्पर्धा परीक्षेत मेहनतीशिवाय यश मिळणार नाही : गजानन पाटील

**कोराडी** ■ दिलीप येवले

तायवाडे कॉलेज महादूला-कोराडी व युनिक ॲकाडेमी नागपुर यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धा परीक्षा समीती अंतर्गत युपीएससी व एमपीएससी परीक्षा संदर्भात मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले . याप्रसंगी प्रमुख वक्ता मा. गजानन पाटील सीनियर फ ?कल्टी , युनीक ॲकेडमी, पुणे तर अध्यक्षस्थानी इंग्रजी विभागप्रमुख डॉ वर्षा वैद्य या होत्या. मा गजानन पाटील यांनी विद्यार्थांना या दोन परीक्षेतील फरक, त्या परीक्षेसाठी असलेले विषय , परीक्षेची पद्धत याबाबत सवीस्तर मार्गदर्शन केले. यासोबतच आपण आपली मौखीक परीक्षेची तयारी कशी करावी, आपण ज्या परीसरात राहतो त्यापरिसराबाबत संपुर्ण ज्ञान मिळविण्याची गरज असल्याचे सांगीतले.

कुठल्याही स्पर्धा परीक्षेत यश मिळवायचे असेल तर विद्यार्थांना मेहनत करावी लागेल एवढेच नाही तर अवांतर वाचन करून चालु घडामोडींची पण संपुर्ण माहीती ठेवावी लागेल असे डॉ. वर्षा वैद्य यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन व आभार स्पर्धा परीक्षा समीतीचे समन्वयक डॉ. योगेश थेरे यांनी केले. या कार्यशाळेला १२५ विद्यार्थी उपस्थित होते.

## २. आर्थिक साक्षरता यावर मार्गदर्शन

## वक्ते .मिस चांदणी पंजवानी







## 3. मिडिया क्षेत्रात असलेल्या विकासाच्या संधी-मार्गदर्शन

वक्ते – मा .संजय भक्ते आकाशवानी नागपुर




**महाराष्ट्र राज्य उच्च तंत्र शिक्षण विभाग व**

**महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र**

**करिअर कट्टा अंतर्गत**

सेंटर ऑफ एक्सलन्स म्हणून तायवाडे कॉलेजचा गौरव






Maharashtra Information Technology Support Center
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

MITSC/OUT/OCTOBER 2024/M/575 दि.23/10/2024

प्रति,
मा. प्राचार्य,
तायवाडे महाविद्यालय, महादुला-कोराडी

विषय: करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत सेंटर ऑफ एक्सलन्स निवडीसाठी अभिनंदनाबाबत.....

महोदय,
उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात अत्यंत आनंद होतो की, महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत राज्यामध्ये उभे करण्यात येणाऱ्या सेंटर ऑफ एक्सलन्स अंतर्गत आपण विहित नमुन्यातील केलेल्या कार्य पूर्ततेनुसार शैक्षणिक वर्ष 2024- 25 मध्ये आपल्या महाविद्यालयाचा A ग्रेड सह सेंटर ऑफ एक्सलन्स च्या यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे. सदर ग्रेड साठी करिअर कट्टा अंतर्गत दिले जाणारे अनुदान रुपये 2,00,000/- इतके असून, राज्यस्तरीय सेंटर ऑफ एक्सलन्स समितीच्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे यापैकी 1,50,000/- रुपये इतकी रक्कम ही महाविद्यालयासाठी खरेदी करण्यात येणाऱ्या साधनसामुग्रीसाठी असून उर्वरित रक्कम म्हणजेच 50,000/- हे स्टुडन्ट स्टार्टअप साठी वापरावयाचा निधी म्हणून महाविद्यालयास देण्यात येणार आहेत. साधनसामुग्री मध्ये देण्यात येणाऱ्या वस्तू आणि त्यांचे मूल्य सोबत दिले आहे. आपल्या प्राप्त ग्रेडनुसार महाविद्यालयाने साधनसामुग्री मागणीचे पत्र सोबत दिलेल्या गुगल फॉर्मवर अपलोड करावे, ही विनंती.
सेंटर ऑफ एक्सलन्स मध्ये निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य व समन्वयक यांचे मनःपूर्वक अभिनंदन!!

कळावे,
आपला विश्वासू,

यशवंत शितोळे
अध्यक्ष
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान
सहाय्यता केंद्र

सोबत:
साहित्य मागणी पत्र नमुना
Google form link: https://forms.gle/bCVDx8F9dMbYGHrBA

Yashwant Shitole
Founder President
+91 73044 29777
0231-2993950

प्रमाणपत्र २३-२४ २४-२५

**सेंटर ऑफ एकक्सलंस निधीतून मिळालेले साहित्य**








Interactive Digital Screen | Laptop | Display Board









Printer | mike | speaker

## कौशल्य विकास केंद्र उपक्रम


प्रधान मंत्री कौशल्य विकास योजने अंतर्गत २४०विद्यार्थ्यासाठी तीन कोर्सेसची मान्यता तायवाडे कॉलेज ला मिळाली होती ते कोर्सेस खालील प्रमाणे आहेत

1.Yoga Instructor-30 विद्यार्थी

2.Pickle Making-30 विद्यार्थी

3.Web Developer-60 विद्यार्थी

हे सर्व कोर्स पूर्ण झालेले असून त्यांची परीक्षा फेब्रूवारी महिन्यात घेण्यात येणार आहे.




Center Status

Conditionally Accredited

My Skill Courses

| Job Role Name (QP Code - Version) | Sector | Job Role Status | Status Date | Actions |
|---|---|---|---|---|
| Yoga Instructor (B&W) (BWS/Q2201) (3.0) | Beauty & Wellness | Application Submitted | 14-Jun-2024 | VIEW |
| Pickle Making Technician (FIC/Q0102) (3.0) | Food Processing | Application Submitted | 14-Jun-2024 | VIEW |
| Web Developer (SSC/Q0503) (3.0) | IT-ITeS | Application Submitted | 08-Jul-2024 | VIEW |



PMKVY-4.0-CSCM - STT - 62599

Back

SKILL HUB INITIATIVE
Name of Project

PMKVY-SHI-TAYWADE COLLEGE MAHADULA KORADI-UGC Recognized Institute
Project Proposal Id

240
Targets

Jun 15, 2024 - Jul 31, 2024
Project Duration

SSC
Assessment Mode







## करीअर संसद पदाधिकारी सभा –

करीअर संसदेच्या सभेचे आयोजन हे पाधाधीकार्यांना सूचना देण्यासाठी केल्या गेल्या.तसेच करीअर डायरी कशी लिहावी यासाठी सुद्धा मार्गदर्शन देण्यात आले .आणि वेळोवेळी रविवारी होणाऱ्या सभेचा अहवाल घेण्यात आला.







## □आधुनिक सावित्री□ या पुरस्कारासाठी अभिनंदन

**महाराष्ट्र राज्य उच्च तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र करिअर कट्टा अंतर्गत शैक्षणिक क्षेत्रात उत्तम काम केल्या बद्दल नागपुर विभागातून मा. प्राचार्य डॉ.शरयु तायवाडे यांची .□आधुनिक सावित्री□ या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. करीअर संसदेच्या पदाधिकाऱ्यांनी 3 जानेवारी सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनी हा पुरस्कार मिळाल्याबद्दल पुष्पगुच्छ देवून प्राचार्यांचे स्वागत केले.**






## करीअर संसद पदाधिकार्यांनी घेतलेल्या मुलाखत - Success stories

आपल्या क्षेत्रात यशस्वी झालेल्या व्यक्तींच्या करीअर संसद पदाधिकार्यांनी घेतलेल्या मुलाखती

यशस्वी व्यक्तीची मुलाखत घेतांना त्यांच्या आयुष्यतील संघर्ष आणि प्रयत्न यातून मिळालेले यश,निर्णय घेण्याची क्षमता या सगळ्यांची माहिती पदाधिकार्यांना मिळाली तामुळे त्यांच्या पण ध्जानात भर पडली









| | | |
|---|---|---|
| बिसिनेस वुमेन | पोलिस अधिकारी | उद्योजक |
| शिल्पा रंगारी | अरविंदकुमार कातलाम | हिमांशू गुप्ता |

**करीअर संसद अधिवेशनासाठी तायवाडे कॉलेज पदाधिकार्यांनी सिटी बिंझाणी कॉलेज नागपुर विभाग ला केलेले सादरीकरण**




**स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यासाठी असलेल्या सुविधा**

**Total Books -24339**

**Journal -75**

**Competitive Exam Books -1775**

**Competitive Exam Journal/Magazines -23**



Library



reading room



computer room internet facility




**Add on course विद्यार्थ्यांचा सहभाग**

**1.Time and Stress Management**

**2.Cyber Law**

**3.Communication Skill and Personality Development**

**या कोर्से ला विद्यार्थी उपस्थित होते .**

DEPARTMENT OF HIGHER AND TECHNICAL EDUCATION, MAHARASHTRA STATE
AND MAHARASHTRA INFORMATION TECHNOLOGY SUPPORT CENTER

# CAREER KATTA

## Certificate

This is to certify that

**ANUSHKA BHIMGADE**

has successfully completed Certificate Course in **Time And Stress Managements -Add On Courses** & pass the exam with the grade **'C'** held in the month of **February-2024**.

Duration: 59 days
Date : 2/1/2024
College Name : Taywade College, Nagpur

Amruta M. Patil
Administrative Coordinator
Career Katta

DEPARTMENT OF HIGHER AND TECHNICAL EDUCATION, MAHARASHTRA STATE
AND MAHARASHTRA INFORMATION TECHNOLOGY SUPPORT CENTER

# CAREER KATTA

## Certificate

This is to certify that

**ANUSHKA BHIMGADE**

has successfully completed Certificate Course in **Communication Skills And Personality Development - Add On Courses** & pass the exam with the grade **'B'** held in the month of **February-2024**.

Duration: 60 days
Date : 2/2/2024
College Name : Taywade College, Nagpur

Amruta M. Patil
Administrative Coordinator
Career Katta

DEPARTMENT OF HIGHER AND TECHNICAL EDUCATION, MAHARASHTRA STATE
AND MAHARASHTRA INFORMATION TECHNOLOGY SUPPORT CENTER

# CAREER KATTA

## Certificate

This is to certify that

**ASHWINI NAGPURE**

has successfully completed Certificate Course in **Cyber Law - Add On Course** & pass the exam with the grade **'D'** held in the month of **January-2024**.

Duration: 16 days
Date : 1/29/2024
College Name : Taywade college Mahadula Nagpur

Amruta M. Patil
Administrative Coordinator
Career Katta